**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

खालील नमूद केलेल्या अपिपलाचा दि.२६.११.२००८ व २३.१२.२००८ व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७३६/ पुणे | सौ.साधना विश्वास हंडे ५३३/३०३९, अक्षय सोसायटी, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे-१८ | प्रबंधक, (कोर्ट क्र.७), जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर न्यायालय आवार, पुणे | प्रथम जिल्हा न्यायालय, शिवाजीनगर न्यायालय आवार, पुणे | सोलापूर-पुणे रोडवर लोणी काळभोर येथे दि.२९.०९.१९९९ रोजी झालेल्या मोटार अपघातामध्ये मयत झालेले श्री.बबन बळवंत साखरे व श्री.मारुती वाघीरे यांचे अपघात-पंचनामा व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचा अहवाल व सदर केसच्या निकालाची प्रत |
| २ | २०१७/ पुणे | श्री.सहदेव त्र्यंबक पत्ती ५०, लाईन बाजार, पूर्व विभाग, सैपर्स, खडकी, पुणे-३ | सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे २८३, नारायण पेठ, पुणे-३० | उप संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे ७४/२, सहकारनगर, पुणे-९ | मौजे नवलाख उंबरे, ता.मावळ, जि.पुणे येथील स.नं.२१२/३, २१३/१, २१३/३ या सर्व्हेची जमीन कोणत्या कारणासाठी वापरता येते? तसेच आपल्या नियंत्रणाखाली असणाऱ्या सरकारी दस्तऐवजाच्या सत्यप्रती. |
| ३ | २२४६ /पुणे | श्री.सहदेव त्र्यंबक पत्ती ५०, लाईन बाजार, पूर्व विभाग, सैपर्स, खडकी, पुणे-३ | सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे २८३, नारायण पेठ, पुणे-३० | उप संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे ७४/२, सहकारनगर, पुणे-९ | मौजे नवलाख उंबरे, ता.मावळ, जि.पुणे येथील स.नं.२१२/३, २१३/१, २१३/३ येथील सर्व्हे नंबरच्या जमिनीमध्ये सरकारमान्य प्रस्तावित रस्ते व याबाबत सरकारी मान्यतेच्या दस्तऐवजाच्या सत्यप्रती. |

या सर्व अपिलांमध्ये पूर्ण कागदपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्याच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षरीत तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकामुळे त्यांच्या अधिकृततेविषयी साशंकता निर्माण होते. तसेच कार्यवाही करावी व तशी माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' च्या व्याख्येशी सुसंगत नाही. वरील बाबी विचारात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ३ (क्रमांक १७३६, २०१७, २२४६ ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दिनांक : १५-०६-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७४१ / पुणे | श्री. शामकांत मंडावळे ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | मौजे लोहगाव येथील सि.स.नं. ३८६ चा झोन दाखला मिळणे बाबत | आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. २६.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| २ | २०१४ + २०२०/ पुणे | श्री. कांतीलाल दलीचंद पारख ३२२/५, महात्मा फुले पेठ, शंकरशेठ रोड, पुणे-४२ | नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण पुणे महानगर-पालिका, पुणे-५ | मौजे घोरपडे पेठ येथील सि.स.नं. ३८६ चा झोन दाखला मिळणेबाबत | |

अनुक्रमांक १ ( अपील क्र. १७४१) या अपिलामध्ये अपीलकर्त्याने पूर्ण कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्याच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षरीत तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकामुळे त्याची अधिकृतता शंकास्पद आहे. तसेच कार्यवाही करावी व त्याची माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे. नकलांसाठी स्वतंत्र नियमावली आहे. अशा संदर्भातील प्रतीसाठी त्या नियमावलीनुसार आवश्यक ती प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील नमूद केलेली अपिले (अनु. क्र. १७४१, २०१४ व २०२०/ पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १६.६.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

(१६०)

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे:

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७६/०९/पुणे | श्री.ए.बी.मनोरे 'संगम', सर्व्हे नं.१०/९-अ, सेनापती बापट चौक, पुणे-१८ | सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, ७९१, लकी बिल्डिंग, नवीन गुरुवार पेठ, पुणे-२ | सह. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, ७९१, लकी बिल्डिंग, नवीन गुरुवार पेठ, पुणे-२ | घर क्र.५३९/०२, रास्ता पेठ-११ या ठिकाणच्या 'रक्त संक्रमण' बाबत एकूण २ मुद्यांची माहिती | अपीलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | १७७/०९/पुणे | श्री.दत्तात्रय कृष्णाजी नलावडे मु.पो.बारडगाव (सुद्रिक), ता.कर्जत, जि.अहमदनगर | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | तहसीलदार, तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | अपीलकर्त्याच्या ७/१२ उताऱ्यात व इतर हक्कात मुलाचे नाव दाखल झाले, मात्र खरेदीचा उल्लेख 'बेकायदेशीर खरेदी' असा आहे. या शब्दाचा महसुलीय अथवा संसदीय अर्थ काय होतो ? | अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र मूळ तक्रारी बाबतची स्पष्टीकरणात्मक माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ८ दिवसात द्यावी. |
| ३ | १८४/०९/पुणे | श्री.गणेश पानसरे १४७, शनिवार पेठ, पुणे-३० | गाव कामगार तलाठी, टाकळी कडेवळीत, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर | मंडल अधिकारी, भाग श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर | मौजे टाकळी कडेवळीत येथील फेरफार उतारा नोंद अनुक्रमांक २१६६ व २२२७ च्या नोंदीच्या अनुषंगाने माहिती | जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे. अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |
| ४ | १९०/०९/पुणे | श्री.अच्युत जनार्दन इनामदार | अपर पोलीस उपायुक्त, ॲन्टी | पोलीस उपायुक्त, ॲन्टी | ऑईल लिव्हर / डिझेल फिल्टर व | गुन्ह्याच्या तपास प्रक्रियेमध्ये अडथळा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्री दिव्यदर्शन सोसायटी, बी-९, विसे मळा, कॉलेज रोड, नाशिक-५ | करप्शन ब्युरो, पुणे यांचे कार्यालय, सी, बॅरॅक, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | करप्शन ब्युरो, पुणे यांचे कार्यालय, सी, बॅरॅक, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | मायक्रो पार्टस बाबत पुणे येथे दाखल केलेल्या गुन्ह्याची प्रत व न्यायालयात चार्जशीट दाखल करण्यासाठी पाठविलेल्या रिपोर्टची प्रत | निर्माण होणार असलेने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (ह) (ई), ॲन्टी करप्शन मॅन्युअल ऑफ इन्सटक्शन १९६८ चे भाग-४, परिच्छेद ११(१) व १६, तसेच महाराष्ट्र शासन जेएडी परिपत्रक नंबर सीडीआर-१७१/सी-६४३६-डी-१, दि.१२.०७.७१ या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. मात्र, २) मूळ माहितीचा अधिकार अधिनियमन्वये केलेल्या अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती अपीलकर्त्यास द्यावी, ३) तपासाच्या सद्यस्थितीची माहिती जजन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास द्यावी. |
| ५ | १९१/०९/पुणे | सौ.गुलशन मोहमंद मन्सूर शेख बी-४, कुमार गॅलेक्सी, ३८२/२, भवानी पेठ, पुणे-२ | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (०१), पुणे | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे | शंकर महाराज सहकारी गृहरचना संस्था मर्या.६४१ पद्मावती, सहकार, पुणे या संस्थेच्या कामाची / दप्तरांच्या अनुषंगाने एकूण ५ मुद्यांची माहिती. | मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन ५६६६/२००७ मध्ये सह.संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागु होत नाही. असा निर्णय दिलेला आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर करावा. |
| ६ | १२५/०९/पुणे | श्री.उस्मान एम. मुल्ला ३२२, एम.जी.रोड, फ्लॅट नं.५, २ रा मजला, बुधानी वेफर्स जवळ, बॉम्बे स्वदेशी स्टोअर्स मागे, कॅम्प, पुणे-१ | जन माहिती अधिकारी, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे-६ | अपिलीय प्राधिकारी, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे-६ | प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा येथील रुग्णालयात वाढ करण्याचा प्रस्ताव असल्यास त्याबाबतची माहिती | अपीलकर्त्याने एक माहिती मिळाल्याचे नमूद करुन अनुषंगिक माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी या विचारणेबाबचा वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळवावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ६ ( अपील क्रमांक १७६, १७७, १८४, १९०, १९१ व १२५ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र.१९१/२००९/ पुणे मध्ये जन माहिती अधिकारी यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कार्यपुर्ततेबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाकडे सादर करणे आवश्यक आहे.

३) अपील क्र.१७७/२००९/पुणे, १९०/२००९/पुणे व १२/२००९/पुणे मध्ये वर नमूद केल्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. १७-०६-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

प्रति

श्री. सुमंगल हरिहर पटवर्धन
दमाजी रोड, मंगळवेढा,
जि. सोलापूर — अपीलकर्ता

अपिलीय प्राधिकारी तथा
मुख्याधिकारी,
मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा
जि. सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
माहिती अधिकारी,
मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा,
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८ / २००९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०७.०७.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०७.०८.२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.०८.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. --- |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br>जन हित याचिका ९५/२००४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दामाजी चौकातील हॉटेल व दुकाने काढण्यासाठी केलेला ठराव, वर्क ऑर्डर, झाडे तोडण्याचे टेंडर, पोलीस बंदोबस्तासाठी नगरपालिकेने केलेला अर्ज. रोडवरील रोड, दुकाने यांना देण्यात आलेल्या नोटिस इत्यादीच्या झेरॉक्स प्रती व अतिक्रमणाबाबत खुलासा. | |

## विवेचन

अपीलकर्ते श्री. सुमंगल हरिहर पटवर्धन यांनी जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, मंगळवेढा नगरपरिषद यांच्याकडे परीलप्रमाणे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि .०७.०८.२००८ रोजी श्री. पटवर्धन यांना उत्तर पाठविले माहितीचा विषय, कालावधी व नेमकी मागणी नमूद नसल्याचे त्यांनी नमूद केले, परंतू समाधान न झाल्याने अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा यांच्याकडे अपील केले. सदर अपिलावर कारवाई न झाल्याने श्री. सुमंगल हरिहर पटवर्धन यांनी राज्यात माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा, यांनी दि. ०७.०८.०९ रोजी दिलेले उत्तर योग्य आहे. परंतु प्रत्येक कामनिहाय माहितीसाठी स्वतंत्र अर्जाची गरज नाही. मात्र आवश्यक असलेल्या माहितीचा नेमका तपशील अर्जामध्ये देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश प्रढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.६.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २६.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५६ + १८५७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | सौ.शालिनीताई दिनकरराव पोटे<br>चिंतामणी, प्लॉट ७२, उजवी भुसारी कॉलनी, कोथरुड, पुणे ४११ ०३८ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सचीव,<br>अलायन्स फ्रान्सेस दि पूना,<br>३०, अमर हौसिंग सोसायटी, ३ रा मजला, गुलमोहर गल्ली,<br>लॉ कॉलेज रोड, पुणे ४११ ००४ | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहायक धर्मादाय आयुक्त,<br>ढोले-पाटील रोड, पुणे ४११ ००१ | गैरहजर |

**विवेचन**

अपीलकर्ते सौ.शलिनीताई दिनकरराव पोटे यांनी सचीव, अलायन्स फ्रान्सेस दि पूना, ३०, अमर हौसिंग सोसायटी, ३ रा मजला, गुलमोहर गल्ली, लॉ कॉलेज रोड, पुणे -४ यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये दोन वेगवेगळे अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागितली होती :-

१) सन २००१ चे दरम्यान श्री.संजय दि.पोटे यांची मेंबरशिप रद्द करण्याच्या ठरावाची प्रत

२) फ्रेंच विद्यापीठ व प्राध्यापक हे व श्री.पोटे यांना शिक्षण पूर्ण करण्यापासून वंचित ठेवत आहेत, ह्याची संस्था कार्यकारिणी व सभासद, संचालकांना माहिती आहे का? (होय./ नाही)

३) संस्थेचे कार्यक्षेत्र कोणते आहे ?

४) संस्थेने Edu-France शी संबंधाबाबत केलेल्या ठरावाची प्रत

५) संस्थेने Edu-France ला जागा व सुविधा देण्याबाबत केलेल्या ठरावाची प्रत इ. अनुषंगिक मुद्दे.

सदर अपिलांचा समावेश दिनांक २६.११.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त करण्यात आला होता. त्यावेळी संस्थेच्या वतीने कोणीही उपस्थित नसल्यामुळे संस्थेच्या सचिवांचा खुलासा मागविण्यात आला. 'संस्थेला राज्य शासन, केंद्र सरकार यांच्याकडून प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष कोणतेही अर्थसहाय्य/ अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सदर संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेमध्ये समाविष्ट होत नसल्याने सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. तरीही सौजन्याचा भाग म्हणून यापूर्वी काही माहिती सौ.पोटे यांना देण्यात आली. परंतु सौ.पोटे ह्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गैरवापर करीत आहेत', असे लेखी निवेदन श्री.बी.सी.तळवलकर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, अलायन्स फ्रान्सेस दि पूना यांनी आयोगास सादर केले आहे.

हा खुलासा लक्षात घेता सदरची संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यामुळे सौ.पोटे यांनी सदर संस्थेविरुध्द आयोगाकडे दाखल केलेली अपिले दखल घेण्यास पात्र नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसतानाही संस्थेने माहिती देण्याचा प्रयत्न केल्याची नोंद आयोग घेत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील दोन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : ३०-०६-२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९२/२००९/ पुणे | श्री. मोहन व्ही.फडके प्लॉट नं.७, सिल्व्हर को.ऑ.हौ.सो. हॅपी कॉलनी, कोथरुड, पुणे | जन माहिती अधिकारी, पुणे नागरी समूह (युएलसी), पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे | अप्पर जिल्हाधिकारी, पुणे नागरी समूह (युएलसी), पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे | तळेगाव दाभाडे नगरपरिषद हे पुणे नागरी समूह अंतर्गत येते त्या अधिसूचनोच्या राजपत्राची प्रत | १) जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. २) राजपत्र / अधिसूचना ही सार्वजनिकरीत्या उपलब्ध कागदपत्र असून त्याच्या प्रती अपीलकर्त्याने घेणे अपेक्षित आहे. तरीही जन माहिती अधिकारी यांनी ते अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावे. |
| २ | १२२६/पुणे | श्री.पांडुरंग निवृत्ती गायकवाड फ्लॅट नं.१ ऋषिकेश अपार्टमेंट, सी.टी.स.नं.६२७ ते ६२९ औंधगाव, पुणे-७ | सहाय्यक आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे | अतिरिक्त आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका, पुणे | स्वतःच्या बदलीच्या अनुषंगाने एकूण ०८ मुद्यांची माहिती | अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील एकूण ८ मुद्यांपैकी ४ मुद्यांची माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. ऊर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १३७२/पुणे | श्री.गणेश दत्तात्रय भांगरे, मु.पो.राजगुरु-नगर, ता.खेड, जि.पुणे | संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, २८, क्वीन्स गार्डन, पुणे -१ | उप संचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन, पुणे -१ | श्रीमती दिपाली विरुध्द पारधी यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीच्या अनुषंगाने एकूण ५ मुद्यांची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २९८७/पुणे | श्री.बापू पांडूरंग पोळ, मु.गोखळी, पो.बिजवडी, ता.इंदापूर, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे-१ | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांचे कार्यालय, पुणे-१ | दि.३१.०३.१९९५ ते दि.०४.०८.२००८ या कालावधीत इंदापूर तालुक्यात आमदार फंडातून व इतर कोणकोणत्या योजना व कोणती विकास कामे झाली, त्या कामांचे एस्टिमेंट व मूल्यांकनाच्या छायांकित प्रती याबाबत एकूण ३ मुद्यांची माहिती | अपीलकर्त्यांने १३ वर्षांमधील विस्तृत माहिती मागितली असून अपिलासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्रमांक १९२/२००९, १२२६, १३७२ व २९८७/पुणे) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक :२९-०६-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९/ २००९ / पुणे | श्री. रामदास गोविंद तिकोणे डायमंड टी डेपो, बारामती श्री.गणेश भाजी मंडई गाळा नं.५६, हेमराज बँगल्स शेजारी, बारामती, जि.पुणे | मुख्याध्यापक, श्री मळगंगा विद्यालय, निघोज, ता.पारनेर जि.अहमदनगर | अपिलीय प्राधिकारी श्री मळगंगा विद्यालय, निघोज, ता.पारनेर जि.अहमद-नगर | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करून देण्यास अवास्तव शुल्क आकारलेबाबत | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री मळगंगा विद्यालय यांनी अपीलकर्त्याकडून आकारलेले जास्तीचे रू.५८१/- शुल्क अपीलकर्त्यास तातडीने परत करावे. |
| २ | १२२/ २००९ /पुणे | श्री.बबनराव राजाराम कोकरे मु.धुमाळवाडी पो.पणदरे, ता.बारामती, जि.पुणे | निवासी नायब तहसीदार, बारामती, ता.बारामती, जि.पुणे | तहसीदार, बारामती, ता.बारामती, जि.पुणे | कॅनॉलच्या पोट पाटाबाबत दिलेल्या अर्जाची प्रत, पोट पाट नाकारण्या-साठी नियमांची सत्यप्रत, निंबाची झाडे तोडण्या-साठी केलेल्या पंचनाम्याची प्रत व अन्य कागदपत्रे | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर वस्तु- स्थितीनुसार आहे. अपीलकर्त्यांच्या योग्य मागण्याबाबत आयोगाने पूर्वी निर्णय दिला आहे. |
| २ | १२६/ २००९ /पुणे | श्री. रूपचंद टिकाराम चौधरी २१२, ए वॉर्ड, दामोदर कॉलनी, भांगरवाडी, लोणावळा | प्रभारी मुख्याध्यापक, डॉ.बी.एन. पुरंदरे बहुविध विद्यालय, लोणावळा, | अध्यक्ष, डॉ.बी.एन. पुरंदरे चॅरिटेबल ट्रस्ट, ३१ सी, डॉ.एन.ए. | विद्यालयातील नियुक्तीच्या संदर्भात एकूण ७ मुद्दयां -बाबतची माहिती | अपीलकर्त्यानी यापूर्वी याच विषयासंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलाबाबत आयोगाने निर्णय दिला आहे. वारंवार, एकाच |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ता.मावळ, जि.पुणे | ता. मावळ जि. पुणे | पुरंदरे मार्ग, मुंबई-०७ | | संस्थेकडे एकाच विषयाची मागणी करून अपीलकर्त्याने सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती वाया घालवू नये, अशी समज देण्यात येत आहे. |
| ४ | १२७/ २००९ /पुणे | श्री. रूपचंद टिकाराम चौधरी २१२, ए वॉर्ड, दामोदर कॉलनी, भांगरवाडी, लोणावळा ता.मावळ, जि.पुणे | प्रभारी मुख्याध्यापक, डॉ.बी.एन.पुरंदरे बहुविध विद्यालय, लोणावळा, जि. पुणे | अध्यक्ष, डॉ.बी.एन.पुरंदरे चॅरिटेबल ट्रस्ट, ३१ सी, डॉ.एन.ए.पुरंदरे मार्ग, मुंबई-४०० ००७ | मुख्याध्यापक तसेच अन्य शिक्षकांच्या वेळापत्रकाची प्रत रजेवरील शिक्षकांच्या तासांची व्यवस्था दर्शविणाऱ्या बुलेटीनच्या प्रती | अपीलकर्त्यांनी यापूर्वी याच विषयासंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलाबाबत आयोगाने निर्णय दिला आहे. वारंवार, एकाच संस्थेकडे एकाच विषयाची मागणी करून अपीलकर्त्याने सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती वाया घालवू नये, अशी समज देण्यात येत आहे. |
| ५ | १३२/ २००९ /पुणे | श्री. सुभाष महादप्पा नावंदे द्वारा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकमल, रत्नागिरी | जिल्हा क्रीडा अधिकारी शांतीकुंज, ३रा मजला, सोमवार पेठ, पुणे | उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे विभाग, नेहरू स्टेडीयम, पुणे | जानेवारी २००६ ते जून २००७ या कालावधीतील अर्जदाराचा वेतनाचा तपशील, आगावू वेतनवाढी विषयक माहिती, अर्जदारांची पत्नी श्रीमती कविता नावंदे-निंबाळकर यांच्या ऑगस्ट ते जून २००७ कालावधीतील रजेचा तपशील | १. माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ व २ बाबत अपीलकर्त्यास दरमहा वेतनचिठ्ठीतून माहिती देण्यात आलेली आहे. २. अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. ३. अपीलकर्त्याची पत्नी सौ.कविता नावंदे-निंबाळकर यांची सेवा खंडित असल्यामुळे त्यांच्या रजेचा अहवाल निरंक आहे, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली आहे. तथापि सौ. नावंदे यांचा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ऑगस्ट २००० पासून कोषागारातून नियमित पगार काढण्यात आला असून सद्य -स्थितीत त्या अमरावती येथे शासकीय सेवेत अस्थाई स्वरूपात कार्यरत असल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले आहे, याबाबत जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| ६ | २२८/ २००९ /पुणे | श्री. सुरेश भाऊसाहेब आल्हाट मु.पो.लवळे, ता. मुळशी, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे | अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, बारणे रोड, माल - धक्का, पुणे | गोल्फ मैदानासाठी बेकायदा पाणी उपसा होत असले प्रकरणा - बाबतची माहिती | अपील अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ७ | २२९/ २००९ /पुणे | श्री. बाळकृष्ण पिराजी जाधव सर्वोदय कॉलनी,मुंढवा, पुणे-३६ | उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२), पुणे | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे | सर्वोदय को.ऑप हौसिंग सोसायटी, मुंढवा यांची सन २००१-०८ पर्यंतची सभासद यादी व वार्षिक सर्वसाधारण सभेची माहिती | सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्तरावरील माहिती मागितली आहे. या अनुषंगाने अपिलीय प्राधिकाऱ्यांचे आदेश कायम करण्यात येत आहेत. |
| ८ | २३५ / २००९ /पुणे | श्री. रा.द. सोनवणे एफ ४/०; १, आयकर वसाहत, सेक्टर २१/२२, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई | उप विभागीय पोलीस अधिकारी, खेड चार्ज जुन्नर विभाग, जि.पुणे | अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे | मौजे निमगाव तर्फे म्हाळुंगे, ता. जुन्नर जि.पुणे येथील गट नं.४२८ च्या बांधावरील आंब्याची झाडे पेटविले प्रकरणी, तसेच पिकांची नासधूस केले प्रकरणी जातीवाचक शिवीगाळ प्रकरणाच्या अनुषंगाने एकूण ९ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास त्वरित सादर करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | २३८/ २००९ /पुणे | श्री. विजय दौलतसिंग मदन विजय व्हीला, व्हिजन हॉस्पिटल जवळ, विसे मळा, कॉलेज रोड, शरणपूर रोड, नाशिक-५ | कार्यालय अधीक्षक, कर आकारणी व कर संकलन कार्यालय, पुणे महानगर-पालिका पुणे-५ | उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन कार्यालय, पुणे महानगरपालिका पुणे-५ | कर आकारणी व कर संकलन प्रमुखांनी दि.२८.११.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये केलेल्या कार्यवाहीची माहिती, सौ.अरूणा हिंदुराव थोरात व श्री.हिंदुराव थोरात यांना केलेल्या पत्र व्यवहाराच्या प्रती व दि. २८.११. २००८ च्या आदेशांची पूर्तता करण्यास झालेल्या विलंबाची कारणे | दि.१६.४.२००९ रोजीचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे आदेश व दि.१८.४. २००९ रोजीचे विधी सल्लागारांचे अभिप्राय विचारात घेता अपील नाकारण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील नमूद केलेली अपिले (अनु. क्र. ११९, १२२, १२६, १२७, १३२, २२८, २२९, २३५ व २३८ /२००९ / पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ११९ / पुणे मध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती देण्याबाबत नमूद /आदेशित केले आहे, त्यानुसार संबंधित अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास आठ दिवसात सादर करावा. अशी पूर्तता न केल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अवये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**पुणे**
**दि. २३.६.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दिनांक २२-१०-२००८ रोजी पुणे/ येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता:-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०९ / ८ सांगली | श्री.मदन हिराचंद शहा फलॅट नं.१६, पिंकपॅलेस, कोल्हापूर रोड, सांगली ४१६ ४१६ | सहायक आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली जिल्हा सांगली | आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली जिल्हा सांगली | बांधकाम परवाना व नळ कनेक्शन संदर्भातील एकूण २० (वीस) मुद्यांची माहिती | माहिती अर्जानुसार माहिती दि.०३.१२.२००७ रोजी मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने लेखी दिले आहे. |
| २ | ४३१ / सांगली | सौ मीरा चंद्रकांत बनसोडे सावंत प्लॉट, पारिजात कॉलनी, जिल्हा सांगली | सहाय्यक ग्रंथालय संचालक, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, प्रशासकीय इमारत, पुणे | ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य,नगर भवन, मुंबई | सन २००६-२००७ साठी नवीन ग्रंथालय मंजुरी/तपासणी इत्यादी संदर्भात माहिती | माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.५.२००७ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर योग्य आहे. |
| ३ | ४३२ / सांगली | श्री.नासर नबीलाल शेख शनिवार पेठ, माधवनगर, ता.मिरज, जिल्हा सांगली | जन माहिती अधिकारी सहाय्यक ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई ४०० ०२३ | अपिलीय प्राधिकारी ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई ४०० ०२३ | सन २००७-२००८ साठी नवीन ग्रंथालय मंजुरी/तपासणी इत्यादी संदर्भातील भ्रष्टाचाराबाबतचा खुलासा, भाष्य इ. माहिती | माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.५.२००७ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर योग्य आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ५१५ / सांगली | श्री.विश्वास विलास कोकाटे रा.मिरज, ९५९ मंगळवार पेठ, चर्च नजीक, ता मिरज, जिल्हा सांगली | चिटणीस ,(आस्थापना शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली | निवासी उप जिल्हाधिकारी, सांगली | दि.२४.६.२००७ रोजी घेणेत आलेल्या परिक्षेच मेरिट, अर्जदार यांना लेखी परीक्षेत मिळालेले गुण व अंशकालीन कर्मचाऱ्यांचे गुण इ.बाबत | अपीलकर्त्यास १५ दिवसांत माहिती देण्यात येईल,असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ४ (क्र. २०९/सांगली, ४३१/सांगली,४३२ /सांगली, ५१५ /सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.५१५/सांगली मध्ये अपीलकर्त्यास विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन देवून ८ दिवसांत आयोगाकडे अनुपालन अहवाल सादर करावा, अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीसह तद्अनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०६-२००९.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ, पुणे येथे दाखल झालेल्या अपिलांवर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **२१४/ २००९ सांगली** | श्री.संजय विजय भिडे १११/१, उत्तर शिवाजीनगर, कै. विष्णू विनायक भिडे मार्ग, गणपती गॅस गोडवून जवळ, सांगली | सह जिल्हा निबंधक वर्ग-१, सांगली राजवाडा परिसर, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, सांगली | नोंदणी उप महानिरिक्षक व मुद्रांक उप नियंत्रक, पुणे विभाग, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे | भाडेपट्टीच्या करारांच्या दस्तांच्या नोंदणीची चौकशी करुन कारवाई करणेबाबत | १. अर्जातील मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीबाबतची आहे.<br>२. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे.<br>३. सह जिल्हा निबंधक वर्ग-१ सांगली यांनी त्याच्या दि. ११.२.०९ च्या पत्रान्वये झालेल्या पुढील कार्यवाहीची माहिती अपील कर्त्यास आठ दिवसांत द्यावी. |
| २ | **२८२/ २००९ सांगली** | अमर नंदकुमार ढोले मु.पो.नागज, ता.कवठेमहांकाळ , जिल्हा सांगली | व्यवस्थापक, सरस्वती इंडेन, कवठेमहांकाळ, जिल्हा सांगली | जिल्हा पुरवठा अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली | गॅस कनेक्शन यादी व पुरवठा यादी | अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडली नाहीत. |
| ३ | **२८३ / २००९ सांगली** | श्री.शिवाजी महादेव जावीर रा.नेलकरंजी, ता.आटपाडी, जि.सांगली | निवासी नायब तहसीलदार, आटपाडी, ता.आटपाडी, जिल्हा सांगली | तहसीलदार, आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली | मौ. नेलकरंजी येथील सि.सं. नं.३६१ जागेत दोन आर जागा देणेबाबतच्या प्रस्तावासंदर्भात | अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ३ (अपील क्र. २१४/२००९ /सांगली, २८२/२००९ /सांगली, २८३/२००९ /सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०-०६-२००९.